# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे

जिल्हा न्यायालय आवार, नवीन इमारत, पहिला मजला
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

दुरध्वणी क्र. ०२०-२५५३४८८१ ई-मेल dlsapune2@gmail.com

जाहिरात दिनांक २०/०९/२०२३
अर्ज सादर करण्याची शेवटची ता. ०५/१०/२०२३
(कार्यालयीन सुट्टयांचे दिवस वगळून)

## कंत्राटी तत्वावर लेखापाल (Accountant)

**पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा करिता खालील पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर ११ महिने या कालावधी करिता भरावयाचे आहे.**

### पदाचे नाव व पात्रता

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या | शैक्षणिक पात्रता (कमीत कमी) | एकत्रित वेतन (सर्व भत्ते मिळून दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १ | लेखापाल (Accountant) | ०१ | १. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त वाणिज्य पदवी किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षण.<br>२. संगणकाचे ज्ञान — एम.एस. ऑफिस, एक्सेल, टॅली, अकाउंटिंग सॉफ्टवेअर्स, एम.एस.सी.आय.टी. वगैरे.<br>३. टंकलेखन गती — उमेदवाराचा टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि. पेक्षा कमी नसावा. (मराठी व इंग्रजी).<br>४. कामाचा अनुभव — मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण / उच्च न्यायालय विधी सेवा समिती / उपसमित्या / जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वा कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात अधिकारी म्हणून काम केले असल्यास किमान २ वर्षांचा | २५,०००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. <u>किंवा</u> उमेदवारास इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा ज्या सामाजीक संस्थेची वार्षिक आर्थिक उलढाल रक्कम रूपये १०,००,०००/— असेल त्यासंस्थेत लेखापाल म्हणून २ वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br><br>५. उमेदवाराला इंग्रजी, हिंदी व मराठी भाषा लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक आहे. | |

## <u>अटी व शर्ती</u>

१. सदरचे पद हे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त ११ महिने या कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. तसेच सदरचे पद हे कोणत्याही स्वरूपाताची पुर्व सुचना न देता केव्हाही रद्द करणेत येईल.

२. या सोबत अर्जाचा नमूना दिलेला असून तसा अर्ज अर्जदाराने गुरूवार दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे या कार्यालयाचे पुढील पत्यावर पोचतील अशाप्रकारे दाखल करावा. दिनांक ०५/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० नंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

<u>**अर्ज दाखल करण्याचा पत्ता :—**</u>

**मा. सचिव,**
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,**
**जिल्हा व सत्र न्यायालय आवार,**
**नविन इमारत, शिवाजीनगर, पुणे ४११००५**

३. अर्जावर / पोष्टाच्या लिफाफ्यावर कोणत्या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करावे तसे नसल्यास अर्ज अपूर्ण समजून त्याचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्ययंसाक्षांकित प्रती दाखल कराव्यात.

५. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून दयावयाचा आहे.

६. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पुर्व सुचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांना राहील.

७. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडवयाची असल्यास दोन महिन्याचे आगाउ सुचना किंवा एक महिन्याचा ढोबळ / स्थुल पगार या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

८. एकत्रित वेतन हे मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

९. उपरोक्त पदाकरीता अर्ज करणेसाठी अर्जदाराने कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

१०. उमदेवारांना कोणत्याही शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा पतसंस्था यामधील लेखा विभागामध्ये प्रत्यक्ष लेख लिहिण्याचा २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे तसेच लेखापाल म्हणून २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य देणेत येईल.

११. उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे अकाउंटिग सॉफ्टवेअर्स / टॅली, एम.एस.सी. आय.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एम.एस. ऑफीस चे ज्ञान आवश्यक आहे.

१२. मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छानणी करून पात्र उमेदवारांची यादी व मुलाखतीची वेळ व दिनांक जिल्हा न्यायालय, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/pune व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

१३. भरती प्रक्रियेच्या माहिती करीता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/pune यास भेट दयावी.

१४. परिक्षा स्थगित करणे / रद्द करणे / अशंत: बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचेकडील निवड समिती स्वत:कडे राखून ठेवत आहे.

स्थळ :— पुणे
दिनांक :— २०/०९/२०२३

प्र. सचिव 20/9/2023
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
पुणे

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे

अंतर्गत

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने या कालावधीकरीता लेखापाल (Accountant) या पदासाठी अर्ज करण्याचा नमुना**

नुकतेच काढलेले पासपोर्ट साईज फोटो

**अर्जाचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज करण्यात येणाऱ्या पदाचे नाव | **लेखापाल (Accountant) कंत्राटी** |
| २ | अर्जदाराचे नाव | |
| ३ | वडील / पतीचे नाव | |
| ४ | पुर्ण पत्ता (पिनकोड सहीत) | |
| ५ | आधार कार्ड क्रमांक | |
| ६ | मोबाईल क्रमांक | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | टंकलेखनाचा वेग | मराठी :— श.प्र.मि.<br>इंग्रजी :— श.प्र.मि. |
| ९ | ई—मेल आय.डी. | |
| १० | संगणक कौशल्य | |
| ११ | जन्म दिनांक | |
| १२ | उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशी वय | दिवस .......... महिना........... वर्षे ........... |

१३. शैक्षणिक अर्हता :—

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१४. कामाचा अनुभव :—

अ. अनुभव :— ..........................................................................

ब. कार्यकाळ :— ..........................................................................

क. संस्थेचे / कार्यालयाचे नाव व पत्ता :— ..................................................

१५. अर्जासोबत उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेबाबत, टंकलेखनाच्या अर्हतेबद्दल तसेच अनुभवाच्या प्रमाणपत्रांबाबत स्वयंसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे नाव :— ..............................................

स्वाक्षरी :— ..............................

ठिकाण :— ..................................

दिनांक :— / /२०२३

# अर्जदाराचे हमीपत्र

मी, ..........................................................................., वय .......... वर्षे, रा.................................................................................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी माझ्याकडून दिलेली वरील सर्व माहिती खरी व बरोबर आहे. वरील माहिती चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी रद्द होईल व होणाऱ्या अन्य कारवाईस मी स्वत: जबाबदार राहीन.

स्थळ :—

दिनांक : — / /२०२३

..................................

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी